# महाराष्ट्र शासन
## विभागीय शिक्षण उपसंचालक,पुणे विभाग


| दूरध्वनी कमांक | (०२०) २६१२२२१७ | १७, डॉ. आंबेडकर मार्ग,लाल देवळासमोर,पुणे– १<br>ई मेल :dydpuno@gmail.comवेबसाईट : www.dydepune.com |
|---|---|---|
| शालेय शिक्षण विभाग | | जा.क्र.शिउसं/माध्य-१०१/पुवि/पवित्र पोर्टल/शालार्थ नावसमाविष्ट/२०२० 3629<br>दिनांक : 13 AUG 2020 |


प्रति,

१. शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर .

२. अधिक्षक (माध्यमिक), वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक, सोलापूर .

विषय : पवित्र प्रणाली अंतर्गत निवड होऊन रुजू झालेल्या शिक्षण सेवक यांना शालार्थ प्रणाली मार्फत वेतन अदा करणेबाबत.

संदर्भ : १.मा. आयुक्त शिक्षण महाराष्ट्र राज्य पुणे यांचे पत्र जा.क्र. आस्था/ प्राथ/ १०६/ पवित्र/ वेतन/ २०१९/८२०/ दिनांक १०.७.२०२०

२. शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद,सोलापूर यांचे पत्र कमांक जिपसो/शिक्षण/माध्य. /२५६८/२०२० दिनांक ०४.०८.२०२०. या कार्यालयास प्राप्त दिनांक ०५.०८.२०२०.

३. शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद,सोलापूर यांचे पत्र कमांक जिपसो/शिक्षण/माध्य. /२४२५/२०२० दिनांक १६.०७.२०२०. या कार्यालयास प्राप्त दिनांक ०५.०८.२०२०.

४. शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद,सोलापूर यांचे पत्र कमांक जिपसो/शिक्षण/माध्य. /२५४०/२०२० दिनांक ०४.०८.२०२०. या कार्यालयास प्राप्त दिनांक ०५.०८.२०२०.

५. शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद,सोलापूर यांचे पत्र कमांक जिपसो/शिक्षण/माध्य. /२५७६/२०२० दिनांक ०४.०८.२०२०. या कार्यालयास प्राप्त दिनांक ०५.०८.२०२०.

उपरोक्त विषयान्वये पवित्र प्रणालीमार्फत राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थासह खाजगी व्यवस्थापनाच्या शाळातील शिक्षक पदभरतीसाठी निवड प्रक्रिया करण्यांत येते. त्यानुसार पवित्र पोर्टलमार्फत प्रसिध्द झालेल्या जाहिराती नुसार संबंधित नियुक्ती प्राधिकारी यांना उमेदवारांची नियुक्तीसाठी शिफारस झालेल्या उमेदवारांची पवित्र पोर्टलवर वेळोवेळी यादी प्रसिध्द करण्यांत आलेली आहे. सदर शिफारस पात्र यादीतील उमेदवारांच्या मूळ कागदपत्रांची पडताळणीअंती शिक्षण सेवक पदासाठी उच्च गुणवत्ताधारक उमेदवारांची निवड होण्याचे दृष्टीने शिक्षण सेवकाची ‘‘अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी’’ यामध्ये मिळालेल्या गुणांचे आधारे पवित्र प्रणालीमार्फत शिफारस केलेल्या पदासाठी संबंधित व्यवस्थापनाने नियुक्ती आदेश दिलेले आहेत. याबाबत मा. माध्यमिक शिक्षण संचालनालया मार्फत वेळोवेळी नियुक्ती प्राधिकारी यांना याबाबत सविस्तर सूचना दिलेल्या आहेत.

त्यानुसार संस्थेकडून पवित्र प्रणाली मार्फत स्थानिक स्वराज्य संस्था व मुलाखती शिवाय पद भरतीचा विकल्प निवडलेल्या संस्थांची पहिली निवड यादी पोर्टलवर प्रसिध्द करण्यांत आलेली आहे. नियुक्ती प्राधिकारी यांनी सदर यादीतील उमेदवारांच्या मूळ कागदपत्रांची पडताळणी करुन नियुक्तीस पात्र असलेल्या उमेदवारांना नियुक्ती आदेश दिलेले आहेत. नियुक्ती प्राधिकारी यांनी दिलेल्या नियुक्ती आदेशानुसार पदस्थापना दिलेल्या शाळेवर सदर उमेदवार शिक्षण सेवक या पदावर रुजू झालेले आहेत. अशा शिक्षण सेवकांना नियमित वेतन सुरु करणे आवश्यक आहे असे संदर्भीय क्र. १ चे पत्रात नमूद आहे. त्यानुसार संदर्भीय पत्र क्रमांक १ व्दारे प्राप्त सूचनानुसार आपण संदर्भीय पत्र क्र. २ चे पत्रासोबत इ प्रपत्रासह सादर करण्यांत आलेल्या प्रस्तावातील शिक्षण सेवक/सहशिक्षक कर्मचा-यांचे नांव शालार्थ प्रणालीमध्ये समाविष्ट करण्यास परवानगी देण्यांत येत आहे.

शालार्थ प्रणालीमध्ये नाव समाविष्ट करण्यास मान्यता दिलेल्या शिक्षण सेवक/सहशिक्षक, यांची माहिती यासोबत जोडलेल्या प्रपत्र इ मध्ये दर्शविण्यात आलेली आहे. सदर माहितीची शालार्थ प्रणालीमध्ये नोंद करण्यात आलेली असून उर्वरीत माहिती शाळेच्या लॉग इन ला (Log in) उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. उर्वरीत माहिती शाळेने भरुन जिल्हयाच्या अधीक्षक, वेतन

Scanned with CamScanner

पथक (माध्यमिक) पुणे यांच्या लॉगईन (Log in) ला पाठवून मान्य करुन घ्यावयाची आहे. संबंधित कर्मचा-याची संपूर्ण माहिती भरल्यानंतरच त्यांचे नाव शालार्थ प्रणालीतील वेतन देयकात समाविष्ठ करण्यात येईल.

<u>प्रपत्र इ</u> Dist. <u>Solapur</u>

| Sr. No | Name of the School | School Shalarth ID No | Full Name of the Employee | Sex (Male/Femal) | Married/Unmarried | Date of Birth | Date of Joining | Name of the Post | मानधन |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Yashwant Vidyalay Pandharpur | 04250100183 | Kanade Govind Shivaji | Male | Unmarried | 01/05/1994 | 24/02/2020 | Shikshan Sevak | 8000/- |
| 3 | Hanuman Vidyamandir Marwade, Tal Mangalwedha Dist – Solapur | 04250100415 | Pragati Chandrashekhar | Female | Unmarried | 06/10/1991 | 24/02/2020 | Shikshan Sevak | 8000/- |
| 4 | Yashwant Madhyamik Vidyalay Bhose (K) Tal Pandharpur | 04250100178 | Shrimati Kurund Manisha Vasantrao | Female | Married | 05/01/1983 | 24/02/2020 | Shikshan Sevak | 8000/- |
| 6 | Yashwant Vidyalay Pandharpur | 04250100183 | Kawade Trupti Ramesh | Female | Married | 10/08/1985 | 25/02/2020 | Shikshan Sevak | 8000/- |

(अनुराधा ओक)
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१

प्रत - माहितीस्तव सविनय सादर
१. मा.आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
२. मा. शिक्षण संचालक, (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे

प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीस्तव रवाना
१. सहसचिव, रयत शिक्षण संस्था, सातारा.

२/- वरिल तक्यातील सर्व मुख्याध्यापकांना त्यांचे शालार्थ आय.डी वरून संबंधित शिक्षकांची उर्वरीत माहिती ऑनलाईन भरण्यावाबत आपल्य स्तरावरून सुचित करण्यात यावे.

Scanned with CamScanner